## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

**(सकाळ)**

जा.क्र. १९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/०१/२०१८

**१) महिलेला अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तिचा विनयभंग करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १०/०१/२०१८ चे १८.०० यातील आरोपीने फिर्यादीला तु आमचे गावचे तंटामुक्ती सदस्य समितीत रिपोर्ट का दिली? या कारणावरुन फिर्यादीचे दारात येवुन तिला मनात लज्जा उत्पन्न होईल अशा अश्लिल शब्दात शिवीगाळ, हातवारे करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५४,४४८,५०९,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) अज्ञात मोटार सायकलच्या धडकेत सायकल चालक स्वाराचा मृत्यु व एक जखमी :–**

दिनांक ०८/१२/२०१८ चे २०.३०ते २१.०० वाजता दरम्यान यातील मृतक कुलदास नत्थुजी वझाळे वय ५५ वर्ष, रा. पाचगाव हा व जखमी युवराज दशरथ लांजेवार वय ४५ वर्ष, रा. पाचगाव हे मासळ वरुन स्वगावी पाचगाव येथे सायकल ने येत असतांना बेलाटी जवळ समोरुन येणाऱ्या यातील अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवुन मृत्युकच्या सायकला धडक मारुन कुलदास यांचे मरणास व मागे बसलेला युवराज यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने मर्ग क्र. ०१/१८ कलम १७४ जाफौ. चे तपासा वरुन निष्पन्न झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना.चनाब यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. सुनगार पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**३) घराचे चाप्यातुन २ बैल चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २९/१२/२०१८ चे २१.०० ते ३०/१२/२०१७ चे ०४.०० वाजता. पर्यत यातील फिर्यादी श्रीमती सुलोचना महादेव खराबे वय ६५ वर्ष, रा. मुरमाडी याने त्याचे घराचे चाप्यात १ बैलजोळी (२बैल) किंमती ३०,०००/–रु. चे बांधुन ठेवले असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचे चाप्यातुन बैलजोळी सोडुन चोरुन नेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णीकर पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**४) भांडण व शिवीगाळ करुन कपाळावर काठीने मारुन जखमी केले . :–**

दिनांक १०/०१/२०१८ चे १०.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी महेन्द्र प्रभुजी रामटेके वय ५२ वर्ष, रा. इंदीरा नगर सावरी याने त्याचे घराचे मागील वाडीतील वांगे, टमाटर बंदर खात असल्याने त्यांना फिर्यादीने हाकलले असता ते बंदर आरोपीचे घरावर गेल्याने आरोपीने फिर्यादीस तु बंदर माझ्या घरावर का हाकल्लास? असे म्हणुन आरोपीने फिर्यादी सोबत भांडण, शिवीगाळ करुन त्याचे कपाळावर काठीने मारुन जखमी केले व पुन्हा मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**५) ६०टक्के जळाल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १०/०१/२०१८ चे १०.०० वाजता. दरम्यान यातील मृतक भोजराम झिबल नंदुरकर वय ७० वर्ष, मुंढरीखुर्द हा दिनांक २९/१२/२०१७ ला ६० टक्के जळाल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिंनाक १०/०१/२०१८ चे १०.०० वा मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. सोलंकी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कटरे पो.स्टे करडी हे करीत आहेत.

**६) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

**अ)** दिनांक १०/०१/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील बोलेरो पिकअप चालकाने एकोडी फाटा रोड साकोली येथील आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**ब)** दिनांक १०/०१/२०१८ चे १४.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पिवळी गाडी चालकाने एकोडी फाटा रोड साकोली येथील आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. निंबार्ते यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निंबार्ते पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**क)** दिनांक १०/०१/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो गाडी चालकाने एकोडी फाटा रोड साकोली येथील आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशऩ तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**७) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १०/०१/२०१८ चे १९.२३ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल दारु पिवुन दारुचे नशेत धोकायादक रित्या बिनापास परवाना वाहन चालवितांना मिळुन आल्याने डॉ. परिक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १८४,१८५,३/१८१ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोहवा. भोंदे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**८) अवैध दारु/जुगार अड्डयांवर धाडी .  :–**

दिनांक १०/०१/२०१८रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर, कारधा, सिहोरा, आंधळगाव, अडयाळ व लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ लिटर हातभट्टी दारू किंमती ३२८०/–रु. तसेच ०४ लिटर ६८०मिली लिटर देशी दारु किंमती १३००/–रु. तसेच जुगारातुन किंमती १९३/–रु. असा एकुण ४,७७३/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १०/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी – ०७ तीन सिटर वाहनांवरती– १२ केसेस व ईतर वाहनांवरती –११५ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.